रयत शिक्षण संस्थेचे

# महाराजा सयाजीराव विद्यालय व ज्युनिअर कॉलेज सातारा.

अकरावी ऑनलाइन प्रवेश अर्ज **2021- 22** भरण्यासाठी मार्गदर्शक सूचना.
विद्यार्थ्यांनी गूगल सर्चबारमध्ये https://msvjr.rayatedu.in हि लिंक सर्च केल्या नंतर विद्यालयाची वेबसाइट ओपन होईल

● इयत्ता अकरावी प्रवेशासाठी प्रथम ऑनलाईन रजिस्ट्रेशन फॉर्म भरल्यानंतर युजर आयडी व पासवर्ड तयार होईल. विद्यार्थ्यांनी युजर आयडी व पासवर्ड लिहून ठेवावा.
त्यानंतर इयत्ता अकरावी प्रवेश अर्ज पुढील क्रमाने भरावा.

**1) Login For Admission**
**a) Select course**
**b) Register mobile number**
**c) Password**

रुपये ५०/- माहितीपत्रक फी भरल्यानंतर पुढील फॉर्म बिनचूक भरावा

**1) Personal Information**
**2) Address**
**3) Last Year Exam & School Information**
**4) Parent details**
**5) Upload Documents**
**6) Educational Qualification**
**7) Subject**
**8) Undertaking**

- वरील सर्व माहिती भरल्यानंतर आपण भरलेल्या फक्त प्रवेश अर्जाची प्रिटं काढून विद्यार्थ्यांनी आपल्याकडे ठेवावी
- सर्व प्रवेश शासकीय नियम व मेरीट नुसारच दिले जातील.
- फक्त रजिस्ट्रेशन केलेल्या व ऑनलाईन प्रवेश अर्ज न करणाऱ्या विद्यार्थ्यां चा गुणवत्ता यादी मध्ये विचार केला जाणार नाही.
- सामाजिक आरक्षण प्रवेशासाठी अर्ज करणाऱ्या विद्यार्थ्यांचेजात प्रमाणपत्र उपलब्ध नसल्यास आई, वडील, भाऊ-बहीण यांचे जात प्रमाणपत्र किंवा विद्यार्थ्यांचे सर्टिफिकेट काढायला दिलेल्याची पावती स्कॅन करावी.
- समांतर आरक्षणासाठी ( बदली कर्मचारी पाल्य,अपंग/ दिव्यांग, प्रकल्पग्रस्त/भूकंपग्रस्त, आजी माजी सैनिक, खेळाडू, अनाथ इ. ) प्रमाणपत्रेस्कॅन करणे आवश्यक आहे. जर प्रमाणपत्रे अपलोड केली नसल्यास त्यांना खुल्या व सामाजिक आरक्षणामधून मेरीटमध्ये बसल्यास प्रवेश दिला जाईल.
- सोबत इयत्ता ११ वी प्रवेश प्रक्रियेचे शासकीय वेळापत्रक पहावे.
- मेरीट लिस्ट ऑनलाईन पाहता येईल
- मूळ शाळा सोडल्याचा दाखला प्रवेशासाठी आवश्यक आहे.
- प्रवेशासंबंधी पुढील माहिती साठी https://msvjr.rayatedu.in ही वेबसाईट वारंवार पहावी.
- अधिक माहितीसाठी खालील फोन नंबर वरती संपर्क करावा.
  - आर्ट्स व कॉमर्स श्री जाधव एन व्ही -- 9373054070
  - विज्ञान अनुदानित श्री अरगडे व्ही वाय -- 9766067623
  - विज्ञान विनाअनुदानित श्री.फाळके एस.डी. -- 9922237796
    श्री.मोकाशी ए.एस.-- 9665571787

श्री काटकर एच एल — उपमुख्याधापक
श्री. जाधव डी जी — प्राचार्य

स्थापना : १९४०



''स्वावलंबी शिक्षण हेच आमचे ब्रीद'' – कर्मवीर

रयत शिक्षण संस्थेचे,

# महाराजा सयाजीराव विद्यालय व ज्युनिअर कॉलेज, सातारा

ता. जि. सातारा

## कला, वाणिज्य, विज्ञान व एम.एल.टी.

शै.वर्ष-२०१८-१९



# माहितीपत्रक

# विद्यालय व ज्युनिअर कॉलेज स्थापनेचा इतिहास

रयत शिक्षण संस्थेचे संस्थापक पद्मभूषण डॉ. कर्मवीर भाऊराव पाटील यांनी बहुजन समाजातील मुलांच्या शिक्षणासाठी सातारा येथे अजिंक्यताऱ्याच्या कुशीत जून १९४० मध्ये हे विद्यालय सुरू केले.


समाजापुढे व विद्यार्थ्यांपुढे आदर्श निर्माण व्हावा म्हणून ती. अण्णांनी बडोद्याचे दानशूर राजे सयाजीराव गायकवाड महाराज यांचे नाव या विद्यालयाला दिले. सुरूवातीस अवघे ५५ विद्यार्थी घेऊन सुरू झालेल्या विद्यालयाच्या वाटचालीत सध्या २३०० विद्यार्थी ज्ञानार्जन करीत आहेत.

विद्यार्थ्यांची व जनतेची वाढती मागणी व शैक्षणिक गरज म्हणून उच्च माध्यमिक शिक्षणासाठी जून १९७५ पासून कला, वाणिज्य, विज्ञान हे इयत्ता ११ वी, १२ वी चे वर्ग सुरू करण्यात आले. सध्या सुमारे ६४० विद्यार्थी ज्युनिअर कॉलेज विभागाकडे शिक्षण घेत आहेत तसेच MLT ची ही सोय केलेली आहे.

विद्यालयाचा विकास व विद्यार्थ्यांची गुणवत्ता वाढविण्यासाठी पद्मभूषण डॉ. कर्मवीर भाऊराव पाटील यांचे नातू डॉ. अनिल आप्पासाहेब पाटील, कार्याध्यक्ष, रयत शिक्षण संस्था, सातारा स्कूल कमिटीचे चेअरमन यांच्या मार्गदर्शनामुळे सुरू झालेल्या 'गुरूकुल' प्रकल्पामुळे या विद्यालयाने संपूर्ण महाराष्ट्रात एक नवा ठसा उमटविला आहे. या विद्यालयाचा परिसर, ती.अण्णांच्या समाधीचा परिसर हिरव्यागार वनश्रीने व्यापलेला आहे. विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालयाचा परिसर भव्य इमारतींनी व्यापलेला असून सांस्कृतिक वातावरण सर्वांगीण विकासासाठी पोषक आहे.

**ग्रंथालय व अभ्यासिका :**

विद्यालयात स्वतंत्र ग्रंथालय आहे. सर्व विषयांच्या पुस्तकांनी ते समृध्द आहे. प्रथम विद्यार्थ्यांना ओळखपत्रासाठी अर्ज करावा लागतो. ओळखपत्राशिवाय विद्यार्थ्यांना ग्रंथालयाचा फायदा घेता येणार नाही. उच्च माध्यमिक विद्यालयाच्या शिस्तीचा एक भाग म्हणून प्रत्येक विद्यार्थ्याने आपले ओळखपत्र नेहमी जवळ बाळगणे आवश्यक आहे. विद्यार्थ्यांना अभ्यासिकेची सोय केली जाते.





### क्रीडाविभाग :

या विद्यालयात व कनिष्ठ महाविद्यालयात शैक्षणिक विकासाबरोबरच शारीरिक विकासावर विशेष लक्ष दिले जाते. निरनिराळ्या खेळांमध्ये विद्यार्थ्यांचा विकास होण्यासाठी दरवर्षी तालुका, जिल्हा, विभाग व राज्य पातळीवरील स्पर्धेसाठी विद्यार्थी पाठविले जातात.

## गुरूकुल प्रकल्प :

इ.११ वी व इ. १२ वी विज्ञान शाखेच्या विद्यार्थ्यांसाठी गुरूकुल प्रकल्प सन २०१३-१४ वर्षापासून सुरु करणेत आला आहे. या प्रकल्पासाठी गुणवत्तेनुसार मर्यादित विद्यार्थ्यांना प्रवेश दिला जातो.

सन २०१५ JEE (Main) च्या परीक्षेमध्ये ३ विद्यार्थी ॲडव्हॉन्स परीक्षेसाठी पात्र झाले.

सन २०१६ JEE (Main) च्या परीक्षेमध्ये ७ विद्यार्थी ॲडव्हॉन्स परीक्षेसाठी पात्र झाले.

सन २०१७ JEE (Main) च्या परीक्षेमध्ये ३ विद्यार्थी ॲडव्हॉन्स परीक्षेसाठी पात्र झाले.

सन २०१८ JEE (Main) च्या परीक्षेमध्ये ७ विद्यार्थी ॲडव्हॉन्स परीक्षेसाठी पात्र झाले.

## प्रकल्पाची वैशिष्टये :

१) दररोज सर्व विषयांचे जादा तास, CET / JEE / NEET सरावसाठी स्वतत्रं तासिका

२) प्रत्येक विषयाच्या दर आठवड्याला नियोजनाप्रमाणे टेस्ट व आदर्श उत्तरपत्रिका विश्लेषण

३) ऑलिंपियाड, जेईई (मुख्य), जेईई (ॲडव्हान्स), आयआयटी, वैद्यकीय प्रवेश परीक्षेसाठी विशेष मार्गदर्शन

४) इ. १२ वी च्या विद्यार्थ्यांना सुरूवातीपासून MPSC / UPSC / CET या धर्तीवर सराव परीक्षेचे आयोजन व मार्गदर्शन

५) तज्ञ व अनुभवी शिक्षक वृंद

६) अद्यावत छापील नोटस्

७) प्रत्येक विद्यार्थ्याकडे वैयक्तिक लक्ष

८) सुसज्ज क्लासरूम उपलब्ध

९) दरमहा पालक सभा

१०) दत्तक पालक योजना

११) आधुनिक तंत्रज्ञानाच्या सहाय्याने अध्यापन-एलसीडी, इंटरनेटचा वापर

१२) अभ्यासिकेची सुविधा

१३) प्रत्येक विषयासाठी तज्ञांची व्याख्याने

१४) प्रत्येक विद्यार्थ्यासाठी सीईटीची पुस्तके ग्रंथालयात उपलब्ध.

१५) रमणीय, आनंददायक व अनुशासित कॉलेज परिसर

# हार्दिक अभिनंदन !

# कनिष्ठ महाविद्यालयाची उत्तुंग भरारी

## सायन्स विभाग एच.एस.सी. मार्च २०१८ मधील गुणवंत विद्यार्थी

|  |  |  |  |  |  |
|---|---|---|---|---|---|
| शिवानी जाधव | कल्याण घाडगे | तनया फडतरे | ओंकार घाडगे | विद्या कणसे | तन्वी जाधव |
| ९४.३०% | ९३.६९% | ९२.४६% | ९१.५३% | ९१.५३% | ९०.१५% |
| P-99, C-96, M-100,B-88 | P-100, C-93, M-100, B-92 | P-96, C-92, M-96, B-87 | P-95, C-88, M-98, B-90 | P-97, C-92, M-100, B-86 | P-97, C-87, M-99, B-82 |
|  |  |  |  |  |  |
| आदिती शिंदे | अंजली शेडगे | सोनल गडांकुश | श्रीधर जाधव | सौरभ भगत | ऋषीकेश बागल |
| ९०.१५% | ८९.६९% | ८९.६९% | ८८.९२% | ८८.१५% | ८८.१५% |
| P-85, C-87, M-95, B-88 | P-96, C-84, M-98, B-81 | P-89, C-87, M-100, B-91 | P-95, C-92, M-99, B-82 | P-93, C-91, M-100, M-87 | P-92, C-89, M-97, B-85 |

निंबाळकर विश्वजीत : ८८%
शिंदे शिवानी : ८६.३०%
खंदारे आदित्य : ८६.००%
गंबरे संज्योत : ८५.६९%
केंजळे पूजा : ८५.०९%

कुंभार अजिंक्य : ८६.६१%
वेळेकर अभिषेक : ८६%
निकम कश्मिरा : ८५.८४%
हांगे स्वप्नाली : ८५.५३%
भुजबळ क्रांती : ८५.०९%

गोरे पूजा : ८६.६१%
कदम प्रतिक्षा : ८६.००%
लोहार विशाल : ८५.६९%
सावंत जयदीप : ८५.२३%

### गणित विषयात १०० पैकी १०० गुण मिळविणारे विद्यार्थी

* जाधव शिवानी
* घाडगे कल्याण
* कणसे विद्या
* भगत सौरभ
* गुरव आदित्य
* शिंदे शिवानी
* गडांकुश सोनल
* कदम प्रतिक्षा
* गंबरे संज्योत
* जाधव मुग्धा

### Subjectwise above 90

Marathi : 26
English : 01
Physics : 19
Chemistry : 07
Maths : 70
Biology : 05
Geography : 01

### भौतिकशास्त्र १०० पैकी १०० गुण मिळविणारा विद्यार्थी

* घाडगे कल्याण *

विज्ञान शाखेतील एकूण विद्यार्थ्यांपैकी ३१ विद्यार्थी इन्स्पायर स्कॉलरशीपसाठी पात्र

विज्ञान शाखेतील २२३ विद्यार्थ्यांपैकी ८९ विद्यार्थ्यांना विशेष श्रेणी व ११८ विद्यार्थ्यांना प्रथम श्रेणी

वाणिज्य शाखेतील ४९ विद्यार्थ्यांपैकी १९ विद्यार्थ्यांना विशेष श्रेणी व २७ विद्यार्थ्यांना प्रथम श्रेणी

कला शाखेतील ३९ विद्यार्थ्यांपैकी ३ विद्यार्थ्यांना विशेष श्रेणी व १५ विद्यार्थ्यांना प्रथम श्रेणी

एम.एल.टी. शाखेतील २० विद्यार्थ्यांपैकी ६ विद्यार्थ्यांना विशेष श्रेणी १० विद्यार्थ्यांना प्रथम श्रेणी

## * गुरुकुल प्रकल्प व क्रॅश कोर्स सन २०१८ मध्ये JEE (Main) Qualified विद्यार्थी *


संज्योत गंबरे


शिवानी जाधव


विशाल कराळे


अभिषेक वेळेकर


कल्याण घाडगे


आदित्य खंदारे


प्रज्वल कुंभार



**पुरस्काराचे स्वरूप : प्रमाणपत्र व रोख रक्कम रू. ५१,०००/- प्रत्येकी**

# गुरुकुलच्या गुणवतांना महाराष्ट्र शासनाचा पुरस्कार

**जाधव राजकुमार यास IISER (आयसर) तिरूअनंतपुरम या नामांकित संस्थेत प्रवेश मिळाला असून त्यास प्रत्येक वर्षी रू. ८०,०००/- प्रमाणे ५ वर्षे शिष्यवृत्ती मंजूर**

## जाधव राजकुमार व मोरे गौरी

**यांना महाराष्ट्र शासनाच्या वतीने स्वर्गिय वसंतराव नाईक गुणवत्ता पुरस्कार सन - २०१७**

# MHT-CET 2018 - RESULT


## शासकीय अभियांत्रिकी, शासकीय औषध निर्माण शास्त्र(डी. फार्म व बी फार्म) आणि ॲग्री महाविद्यालयात प्रवेश मिळू शकणारे गुणवंत विद्यार्थी.



कल्याण घाडगे
P-37,C-42,B-85,M-70
PCB-164, PCM-149



शिवानी जाधव
P-34,C-46,B-68,M-78
PCM-158, PCB-148



संज्योत गंबरे
P-30,C-41,B-54,M-80
PCM-151, PCB-125



तनया फडतरे
PCM-141, PCB-111



आदित्य गुरव
PCM-129



अदिती शिंदे
PCB-125



विवेक गायकवाड
PCM-122



ऋषिकेश बागल
PCB-122, PCM-104



सोनल गडांकुश
PCM-120, PCB-100



पूजा केंजळे
PCM-119



अर्थव जाधव
PCM-118



विद्या कणसे
PCB-115, PCM-110



अंकित यादव
PCM-115



जयदीप सावंत
PCM-115



किर्ती काटकर
PCB-112, PCM-102



प्रतिक्षा कदम
PCB-110, PCM-108



प्रशांत करांडे
PCB-108



ओंकार घाडगे
PCM-109



कश्मिरा निकम
PCM-107



प्रज्वल कुंभार
PCM-107



प्राजक्ता फाळके
PCM-106



स्वप्नाली हंगे
PCB-103



श्रीधर जाधव
PCM-102



तन्वी जाधव
PCM-102



अथर्व कुलकर्णी
PCM-101



अभिषेक वेळेकर
PCM-100

| नेहा घाडगे | विश्वजीत निंबाळकर | मुग्धा जाधव |
|---|---|---|
| PCB-120 | PCB-110 | PCM-108 |

## IISER - पात्रता परीक्षेसाठी ८४ विद्यार्थ्यांची निवड

## शिष्यवृत्त्या व इतर सवलती :

या उच्च माध्यमिक विद्यालयात प्रवेश घेणाऱ्या गरीब होतकरू व पात्र विद्यार्थ्यांना महाराष्ट्र सरकारमार्फत मिळणाऱ्या शिष्यवृत्त्या व सवलती उपलब्ध करून दिल्या जातात. अशा सवलतींची व शिष्यवृत्त्यांची यादी पुढे दिली आहे.

१) ई.बी.सी. फ्री शिप

२) बी.सी. फ्री शिप

३) मिलिटरी सर्व्हिसमनच्या मुलांना फ्री शिप

४) प्राथमिक शिक्षकांच्या मुलामुलींसाठी फ्री शिप

५) वॉर एज्युकेशन कन्सेशन

६) नॅशनल मेरिट स्कॉलरशिप

७) गव्हर्मेंट ओपन मेरिट स्कॉलरशिप

८) बी.सी. स्कॉलरशिप

९) ई.बी.सी. स्कॉलरशिप

१०) अपंग मुलांसाठी स्कॉलरशिप

११) उच्च माध्यमिक विद्यालयातील पारितोषिके व सवलती.

वर दिलेल्या शिष्यवृत्त्या व सवलती विषयाची निवेदने वारंवार सूचना फलकावर लावली जातात. संबंधित विद्यार्थ्यांनी दिलेल्या मुदतीच्या आत कार्यालयातील संबंधित लिपिकांशी संपर्क साधून ज्या त्या विषयाची सविस्तर माहिती मिळवावी.

## खालील अटींची पूर्तता केलेल्या विद्यार्थ्यांनाच कनिष्ठ महाविद्यालयाच्या पहिल्या वर्गाला (इ.११ वी) प्रवेश दिला जाईल.

१. भारतातील कोणत्याही सरकारमान्य परीक्षा मंडळाने नवीन आकृतीबंधानुसार घेतलेली १० वी ची परीक्षा इंग्रजी विषय घेऊन उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यास कनिष्ठ महाविद्यालयाच्या पहिल्या वर्षाला (इ. ११ वी) प्रवेश घेता येईल.

२. इंडियन सर्टिफिकेट ऑफ सेकंडरी एज्युकेशन परीक्षा पास झालेल्या विद्यार्थ्याला पहिल्या वर्षात प्रवेश घेता येईल.

३. नवी दिल्ली येथील सेंट्रल बोर्ड ऑफ सेकंडरी एज्युकेशनची १० वी ची (हायर सेकंडरी) परीक्षा उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्याला ११ वी ला प्रवेश घेता येईल.

४. इ. ११ वी विज्ञान शाखेमध्ये प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यास इ.१० वी ला विज्ञान विषयात १०० पैकी ४० गुण आवश्यक.

विद्यार्थ्याने पहिल्या वर्षाला (इ. ११वी) प्रवेश घेण्यासाठी ठराविक नमुन्यातील छापील अर्ज योग्य ती माहिती भरून सादर करावा. या अर्जासोबत खालील दाखले जोडावेत.

१) शाळा सोडल्याच्या मूळ दाखल्याची झेरॉक्स प्रत.

२) मूळ गुणतक्त्याची झेरॉक्स प्रत (मार्कलिस्टची झेरॉक्स)

३) जातप्रमाणपत्र व इतर प्रमाणपत्रांच्या झेरॉक्स प्रति

सूचना : इ. ११ वी मध्ये प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांनी दाखला व गुणपत्रकाच्या आवश्यक तेवढ्या झेरॉक्स स्वतःकडे काढून घ्याव्यात व त्या सर्व प्रती प्रमाणित करून घ्याव्यात.

## * कनिष्ठ महाविद्यालयाची वेळ *

**सकाळी ८.०० ते दुपारी १.५०**

*** कार्यालयाची वेळ : सकाळी १०.३० ते सायंकाळी ५.४५**

## इयत्ता ११ वी अभ्यासक्रम (विषय)

इ.११ वी साठी ३ आवश्यक व ४ ऐच्छिक असे एकूण ७ विषय घ्यावे लागतात. तसेच शारीरिक शिक्षण हा विषय अनिवार्य राहील.

| | कला | वाणिज्य | विज्ञान | एम.एल.टी. |
|---|---|---|---|---|
| १. | मराठी | मराठी | मराठी | मराठी |
| २. | इंग्रजी | इंग्रजी | इंग्रजी | इंग्रजी |
| ३. | सहकार | सहकार | भौतिकशास्त्र | पायाभूत अभ्यासक्रम |
| ४. | भूगोल | व्यापार संघटन (OC) | रसायनशास्त्र | पेपर १ ॲना. फिजि.ॲण्ड बायोकेम |
| ५. | अर्थशास्त्र | अर्थशास्त्र | जीवशास्त्र | पेपर २ क्लिनिकल बायोकेमेस्ट्री |
| ६. | इतिहास | पुस्तक पालन व लेखाकाम (A/c) | गणित | पेपर ३ मायक्रोबायोलॉजी |
| ७. | पर्यावरण | पर्यावरण | पर्यावरण | पर्यावरण |

**एकदा निवडलेली शाखा प्राचार्यांच्या परवानगीशिवाय बदलता येणार नाही.**

## पात्रता व स्थलांतर प्रमाणपत्रे :

भारतातील महाराष्ट्राशिवाय इतर राज्यांतील उच्च माध्यमिक परीक्षा मंडळाने घेतलेल्या परीक्षेत पास झालेल्या विद्यार्थ्यांना महाराष्ट्र राज्यातील कनिष्ठ महाविद्यालयात प्रवेश घेताना प्रवेश अर्जासोबत पात्रता प्रमाणपत्र व स्थलांतराचा दाखला सादर करावा लागेल. पात्रता प्रमाणपत्रासाठी विभागीय सचिवांकडे रू. ५०/– शुल्क भरून अर्ज करावा.

# महाविद्यालयाचे शिस्त पालनासंबंधीचे नियम

१. उच्च माध्यमिक विद्यालयात व विद्यालयाच्या प्रांगणात विद्यार्थ्यांनी स्वतःजवळ ओळखपत्र बाळगणे आवश्यक आहे.

२. सर्व प्रकारची वाहने निर्धारित सायकल स्टँडमध्ये लावण्यात यावीत. मैदानावर वाहने फिरविण्यास सक्त मनाई आहे.

३. विद्यालयातील तास सुरू असताना व्हरांड्यामध्ये फिरू नये.

४. विद्यार्थ्यांनी सर्व तासांना आणि स्वाध्यायांना नियमितपणे हजर राहिले पाहिजे, बोर्ड नियमानुसार ज्या विद्यार्थ्यांची हजेरी ७५% पेक्षा कमी असेल त्यांचे परीक्षा अर्ज पाठविले जाणार नाहीत. पूर्व परवानगीशिवाय सलग एक महिन्यापेक्षा अधिक काळ गैरहजर राहणाऱ्या विद्यार्थ्यांचे नाव कमी करण्यात येईल व अशा विद्यार्थ्यांकडून संपूर्ण वर्षाचे शुल्क वसूल केले जाईल.

५. सूचना फलकावर लावण्यात येणाऱ्या सूचना नियमितपणे वाचाव्यात.

६. कनिष्ठ महाविद्यालयाने आयोजित केलेल्या जादा तासांना विद्यार्थ्यांनी उपस्थित राहणे सक्तीचे आहे, गैरहजर विद्यार्थ्यांना दंड केला जाईल.

७. विद्यार्थ्यांकडून खालील गैरप्रकार घडल्यास प्रवेश ताबडतोब रद्द करून कठोर कारवाई केली जाईल.

अ) कोणत्याही अभ्यासक्रमासाठी बनावट व चुकीच्या कागदपत्रांच्या आधारे प्रवेश घेणे.

ब) विद्यालयाच्या कामकाजात अडथळा येईल असे कोणतेही कृत्य करणे.

क) विद्यालयाच्या आवारात घातक शस्त्र, स्फोटके, ॲसीड यांसारखे पदार्थ स्वतः जवळ बाळगणे.

ड) कोणतेही मादक पदार्थ स्वतःजवळ बाळगणे व त्याचे सेवन करणे.

इ) विद्यालयाच्या आवारात कोणत्याही विद्यार्थ्यास दम देणे व छळ करणे.

प) विद्यालयाच्या आवारात कोणत्याही प्रकारच्या मारामारीच्या, दहशतीच्या धमकीच्या किंवा मुलींची छेड काढण्याच्या कृत्यात सामील होणे.

फ) विद्यालयाच्या मालमत्तेची हानी करणे किंवा चोरी करणे.

८. आपल्या जाणीवपूर्वक वा अजाणता केलेल्या कृत्याने रयत शिक्षण संस्था आणि हे कनिष्ठ महाविद्यालय यांच्या नाव लौकिकास व प्रतिष्ठेस बाधा पोहोचेल असे विद्यार्थ्यांचे वर्तन असू नये.

९. या नियमामध्ये बदल करण्याचा मा. प्राचार्यांचा अधिकार राहील.

१०. ज्युनिअर कॉलेजच्या विद्यार्थ्यांना गणवेश सक्तीचा राहील.

११. मोबाईल स्वतःजवळ बाळगण्यास बंदी आहे.

* * *



क्षेत्र भेट



विविध कला गुणांना वाव



क्रीडा स्पर्धेतील सहभाग



व्यवसाय मार्गदर्शन



विकली टेस्ट



प्रेरणादायी व्याख्यान



फिजीक्स लॅब



केमेस्ट्री लॅब



बायोलॉजी लॅब



पथनाट्याद्वारे सामाजिक प्रबोधन



शिक्षक-विद्यार्थी-पालक मिटींग



गुणवंत विद्यार्थ्यासमवेत शिक्षक व पदाधिकारी



प्रशस्त हॉल



प्रशस्त क्लासरूम



नवीन इमारत

रयत शिक्षण संस्थेचे,

# महाराजा सयाजीराव विद्यालय व ज्युनिअर कॉलेज, सातारा.

## * कॉलेजची ठळक वैशिष्ट्ये *

१. इयत्ता ११ वी, १२ वी कला, वाणिज्य, विज्ञान, **MLT** शाखांची सोय.

२. संदर्भग्रंथ, क्रमिक पुस्तके, नियतकालिके यांनी समृध्द असलेले ग्रंथालय.

३. अनुभवी तज्ञ व व्यासंगी प्राध्यापक वर्ग.

४. विद्यालयाची भव्य इमारत व कनिष्ठ महाविद्यालयाची स्वतंत्र इमारत.

५. विज्ञान विषयांच्या स्वतंत्र अद्ययावत प्रयोगशाळा.

६. केंद्र सरकार पुरस्कृत अटल टिंकरिंग लॅबची सोय.

७. हुशार, गरजू, होतकरू विद्यार्थ्यांसाठी आर्थिक सवलत.

८. उत्कृष्ट निकालाची परंपरा.

९. विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी वैयक्तिक मार्गदर्शन.

१०. इयत्ता बारावीसाठी उन्हाळी वर्ग व हिवाळी वर्ग.

११. संगणक, इंटरनेट व प्रोजेक्टरची सोय.

१२. JEE, NEET, MHT-CET या स्पर्धा परीक्षा करिता मार्गदर्शन.

१३. १०० % बोर्ड निकालाची परंपरा.

१४. इ. १० वीतून ११वी मध्ये येणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी Foundation course

१५. इ.१२ वीतील विद्यार्थ्यांसाठी CET/JEE/NEET साठी Crash course



बुक-पोस्ट

प्रति,

* प्रेषक *

प्राचार्य,

महाराजा सयाजीराव विद्यालय व ज्युनिअर कॉलेज, सातारा.

ता. जि. सातारा

फोन : (०२१६२) २३९३८८

Email : hmsayaji@gmail.com | sataramsvcr@gmail.com

किंमत रु.

रयत शिक्षण संस्थेचे,

# महाराजा सयाजीराव विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय, सातारा.



## उत्तुंग भरारी... हार्दिक अभिनंदन

## H.S.C. Board Result
Feb / Mar 2020

### विज्ञान विभागातील यशाचे मानकरी




92.92% RAJE PRATHAMESH S. | 91.38% MOHITE PRATIKSHA S. | 91.08% WAGHMODE AKSHAY M. | 89.38% JADHAV SAMRAT V. | 89.08% PAWAR POORVA N. | 88.46% NARKAR SAYALI S. | 88.31% GAIKWAD MANASI B. | 88.00% JAGDALE VAISHNAVI V. | 87.38% KADAM MRUDULA S. | 87.23% KUBADE VISHWAJEET V. | 87.23% KANASE OMKAR A.



87.08% JADHAV OMKAR A. | 86.62% PHADATARE SNEHA K. | 86.62% SHINDE JAYESH V. | 86.46% PISAL SRUSHTI M. | 86.46% JADHAV ARPITA D. | 85.85% THORAT OMKAR S. | 85.85% SHEDAGE AVANTIKA S. | 85.69% CHAVAN SWAPNALI T. | 85.69% SHINDE RAHUL A. | 85.38% KALANGE SAYALI J. | 85.38% NANAWARE YOGESH G.

आमचे मार्गदर्शक



आदरणीय
डॉ. अनिल पाटील साहेब
चेअरमन, रयत शिक्षण संस्था, सातारा

**SCIENCE 100%**

### ABOVE 80 % IN SCIENCE

| | |
|---|---|
| 1.MANE RUTUJA R. | 84.77% |
| 2.KADAM KUNAL V. | 84.46% |
| 3.JAGADALE SHWETA R. | 83.23% |
| 4.BABAR NIKITA S. | 83.23% |
| 5.GHADGE ROHIT M. | 83.23% |
| 6.KADAM PRACHI D. | 83.23% |
| 7.NALAWADE PRAJWAL S. | 82.77% |
| 8.BHOSALE RUTUJA B. | 82.46% |
| 9.WAYDANDE TEJAS S. | 82.31% |
| 10.BARGE PRATIKSHA R. | 82.31% |
| 11.GHADGE SANIKA B. | 82.15% |
| 12.DHANAWADE PRASAD A. | 82.00% |
| 13.PATIL ADITYA M. | 81.69% |
| 14.TAMBOLI SAYMA A. | 81.38% |
| 15.SAPKAL NIKITA N. | 81.38% |
| 16.NALAWADE SHRADDHA D. | 81.38% |
| 17.SHINDKAR SRUSHTI S. | 81.23% |
| 18.SABALE ABHISHEK S. | 80.92% |
| 19.BANDI SANJANA S. | 80.62% |
| 20.DHUMAL CHINTAMANI U. | 80.62% |
| 21.KITTUR CHETANA S. | 80.46% |
| 22.MOKASHI MANASI S. | 80.46% |
| 23.NARAYANE SHREYA R. | 80.31% |
| 24.KALANGE AKANKSHA S. | 80.31% |
| 25.ANUSE SONALI B. | 80.15% |

### COMMERCE 100%



85.69% KUMBHAR PRATIKSHA | 84.15% JAGADE KARINA

| | |
|---|---|
| SHINDE GAURI | 81.69% |
| KAMBALE NIKITA | 80.77% |
| MOHITE SWANAND | 80.15% |

### ARTS 97.62%



76.01% SALUNKHE PALLAVI | 73.84% NADUNE ASHWINI

| | |
|---|---|
| GADHAVE PRADNA | 72.15% |
| KHEDAKAR PRIYANKA | 72.15% |

### MLT 95.65%



86.10% AAGUNDE AISHWARYA | 84.00% KHAMKAR SAYLI

| | |
|---|---|
| SHINDE PRANALI | 83.84% |
| KHAMKAR SHREYA | 82.00% |
| PUJARI SWAPNALI | 81.84% |
| JADHAV MANASI | 81.05% |

**SCIENCE**
Above 90% - 03 Students
Above 85% -22 Students
88 Students have Distinction
110 Students have First class

**Commerce**
Above 85% -9 Students
16 Students have Distinction
36 Students have First class

**Arts**
1 Student has Distinction
13 Students haveFirst class

**MLT**
Above 85% - 1 Student
9 Students have Distinction
10 Students have First class

**SCIENCE**
**24 Students have qualified for INSPIRE SCHOLARSHIP**
**(80,000 Rs. / year-For 5 years)**

शुभेच्छुक

सर्व शिक्षक
व
सेवक वृंद

श्री. डी. जी. जाधव
प्राचार्य

जा.क्र.उमा-३/११वीप्र/कोवि/२०२१-२२/ 16019-23
शिक्षण उपसंचालक कार्यालय, कोल्हापूर
दिनांक – 15 AUG 2021

प्रति,

शिक्षणाधिकारी (माध्यमिक)
जिल्हा परिषद, कोल्हापूर/सांगली/सातारा/रत्नागिरी/सिंधुदुर्ग

विषय :- इ. ११ वी. प्रवेश सन-२०२१-२२ बाबत सूचना
(कोल्हापूर व गडहिंग्लज शहरस्तरीय केंद्रीय प्रवेश वगळून)

उपरोक्त विषयास अनुसरुन आपणास कळविणेत येते की, **सन २०२०-२१ या शैक्षणिक वर्षासाठी** महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक मंडळामार्फत आयोजत करण्यात येणारी माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षा (इ.१० वी) रद्द करण्यात आली व सदर परीक्षेचा निकाल १० वी च्या मुल्यमापन पध्दतीनुसार घोषित करण्यात आला आहे. सबब सन २०२१-२२ ची इयत्ता ११ वी ची प्रवेश प्रक्रिया दि.१८.०८.२०२१ पासून सुरु करण्यात यावी. **प्रवेश प्रक्रियेचे वेळापत्रक सोबत जोडले आहे.**

आपल्या जिल्हयातील सर्व कनिष्ठ महाविद्यालयांच्या प्राचार्य/मुख्याध्यापकांना इ.११ वी प्रवेश सन २०२१-२२ बाबत खालील प्रमाणे सूचना देण्यात याव्यात:-

१. इ.११ वी प्रवेश प्रक्रिया राबवत असताना शालेय शिक्षण विभाग शासन निर्णय दि. २६ जून,१९९७ मधील तरतुदी, व त्यानंतर वेळोवेळी शासनाने प्रवेशासंबंधी निर्गमित केलेल्या शासन आदेश व शासन पत्रांतील तरतुदींचे पालन करणे.
२. **सद्यस्थितीत कोरोना विषाणू प्रादुर्भावामुळे निर्माण झालेली परिस्थिती मधील सर्व नियम पाळणे आवश्यक आहे. त्यानुषंगाने प्रवेश प्रक्रियेसाठी शक्य असल्यास कनिष्ठ महाविदयालयस्तरावर ऑनलाईन पध्दतीचा वापर करणे सोईस्कर होईल, त्यादृष्टीने नियोजन करणे.**
३. ऑनलाईन पध्दतीने विदयार्थ्यांचा प्रवेश अर्ज व संबंधित कागदपत्रे घेवून प्रवेश निश्चित करावा. तसेच इ.११ वी प्रवेशासाठी आवश्यक शैक्षणिक शुल्क हे ऑनलाईन ( Payment Gateway, Google Pay, Paytem, UPI, Phone Pay, Debit, Credit Card, Net Banking इ. ) माध्यमाव्दारे भरण्याची सूविधा उपलब्ध करुन देण्यात यावी.
४. ज्या ठिकाणी ऑनलाईन पध्दतीने प्रवेश करणे शक्य नाही तेथे अंतराचा निकष व शासनाने कोविड-१९ बाबत घालून दिलेले निकष पाळून टप्या-टप्याने विद्यार्थ्यांना बोलावून प्रवेश प्रक्रिया पार पाडावी. प्रवेश प्रक्रियेवेळी महाविदयालयामध्ये गर्दी होणार नाही याबाबत दक्षता घेण्याची सूचना द्यावी.
५. अनुदानित तुकडयातील वाढीव विद्यार्थी क्षमतापूर्ण झालेनंतरच क्रमाने विनाअनुदानित तुकडयामधील प्रवेश क्षमता पूर्ण करावी.
६. इ. १० वी उत्तीर्ण झालेल्या व इ. ११ वी वर्गात प्रवेश घेवू इच्छिणाऱ्या सर्व विद्यार्थ्यांना इ. ११ वी वर्गात प्रवेश मिळेल तसेच इ. ११ वी. प्रवेशाविना विद्यार्थी वंचित राहणार नाही याची दक्षता घ्यावी.
७. इ. ११ वी प्रवेश देतांना मंजूर क्षमतेपेक्षा जादा प्रवेश देणेत येवू नयेत जेणे करुन परिसरातील मंजूर तुकडयावर अनिष्ट परिणाम होणार नाही याची दक्षता घ्यावी.

इ.११ वी. प्रवेशाबाबत पालक व विद्यार्थी यांना नाहक त्रास होणार नाही व कोणत्याही प्रकारची तक्रार या कार्यालयास प्राप्त होणार नाही दक्षता घ्यावी. आपल्या जिल्हयातील इ. ११ वी. प्रवेश प्रक्रिया शांततेत व सुरळीत पार पाडणेचे दृष्टीने योग्य ते नियोजन करावे. **कोविड-१९ प्रादुर्भाव रोखणेसाठी सर्व निकष पाळून प्रवेश प्रक्रिया कमीत-कमी वेळेत पूर्ण होण्यासाठी सर्व घटकांना सहाय्य करण्याचे निर्देश देण्यात यावेत.**

(स.ध.सोनवणे)
**शिक्षण उपसंचालक,**
**कोल्हापूर विभाग, कोल्हापूर**



Scanned with CamScanner

## इयत्ता ११ वी. प्रवेश प्रक्रिया सन २०२१-२२ कोल्हापूर विभागाचे वेळापत्रक

### कोल्हापूर, सांगली, सातारा, रत्नागिरी व सिंधुदुर्ग जिल्ह्यांसाठी
### (कोल्हापूर शहर व गडहिंग्लज शहर वगळून)

| दिनांक | वार | कालावधी | कार्यवाही |
|---|---|---|---|
| १८.०८.२०२१<br>२०.०८.२०२१<br>२१.०८.२०२१<br>२३.०८.२०२१ | बुधवार<br>शुक्रवार<br>शनिवार<br>सोमवार | ४ दिवस | फॉर्म देणे व स्विकारणे. |
| २४.०८.२०२१<br>२५.०८.२०२१<br>२६.०८.२०२१ | मंगळवार<br>बुधवार<br>गुरुवार | ३ दिवस | प्रवेश अर्जांची छाननी, तपासणी व गुणवत्ते नुसार निवड यादी व प्रतिक्षा यादी तयार करणे. |
| २७.०८.२०२१ | शुक्रवार | १ दिवस | दुपारी ३-०० वाजेपर्यंत निवड यादी व प्रतिक्षा यादी सूचना फलकावर लावणे. |
| २८.०८.२०२१<br>३०.०८.२०२१<br>३१.०८.२०२१<br>०१.०९.२०२१ | शनिवार<br>सोमवार<br>मंगळवार<br>बुधवार | ४ दिवस | निवड यादीतील विद्यार्थ्यांना प्रवेश देणे. |
| ०२.०९.२०२१<br>०३.०९.२०२१ | गुरुवार<br>शुक्रवार | २ दिवस | प्रवेश शिल्लक असल्यास प्रतिक्षा यादीतील विद्यार्थ्यांना मूळ कागदपत्राच्या आधारे प्रवेश देणे. |
| ०४.०९.२०२१<br>०६.०९.२०२१ | शनिवार<br>सोमवार | २ दिवस | दुसऱ्या प्रतिक्षा यादीतील विद्यार्थ्यांना प्रवेश शिल्लक असतील तर मूळ कागदपत्रांच्या आधारे प्रवेश देवून प्रवेश प्रक्रिया पुर्ण करणे. |
| ०७.०९.२०२१ | मंगळवार | कनिष्ठ महाविद्यालयातील इ.११ वी वर्ग ऑनलाईन पध्दतीने सुरु करावे. प्रत्यक्ष वर्ग सुरु करणेबाबत शासनाकडून आदेश प्राप्त झाल्यानंतर अवगत करण्यात येईल. | |

(स.ध.सोनवणे)
शिक्षण उपसंचालक,
कोल्हापूर विभाग, कोल्हापूर

Scanned with CamScanner